# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्हयातील घरबांधणी व घरदुरुस्तीच्या परवानगीचे सर्व अधिकार ग्रामपंचायतीकडे देण्याबाबत

**(१) २१८ (११-०४-२०२०). श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी -सिंधुदुर्ग जिल्हयातील घरबांधणी, घरदुरुस्तीच्या परवानगीचे व गावठाण क्षेत्रातील घरबांधणीची परवानगी देण्याचे सर्व अधिकार महसुल विभागाकडून ग्रामपंचायतीकडे देण्याबाबत घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी अदयाप झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा पातळीवर राज्य शासनाने जारी केलेल्या आदेशामध्ये महसूल विभागाकडून, नगररचना विभागाकडून घरबांधणी परवानगी घेणे आवश्यक असल्याचे नमूद केले असून या जाचक अटी काढून घरबांधणी परवानगीचे सर्वच्या सर्व अधिकार ग्रामपंचायतीकडे देण्याबाबत निर्णयात्मक कार्यवाही करुन तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी अशी मागणी सिंधुदुर्ग जिल्हयातील लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक ०७ जानेवारी, २०२० वा त्यासुमारास रोजी लेखी निवेदनाव्दारे केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१८-०१-२०२२) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये बृहन्मुंबई व काही नियोजन प्राधिकरणे वगळता संपूर्ण राज्यासाठी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली दि.०२.१२.२०२० रोजीच्या अधिसूचनान्वये लागू करण्यात आली आहे.

सदरच्या अधिसूचना व त्यामधील तरतुदी ग्रामीण क्षेत्रातील घरबांधणी परवानगीच्या अनुषंगाने विस्तृतपणे सर्व संबंधित क्षेत्रिय विभागाच्या निदर्शनास आणण्यात आलेल्या आहेत.

सदर एकत्रितकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (Unified Development Control And Promotion Regul ations) मधील खंड क्र.२ मधील २.१.२ (XV) येथील तरतुदीनुसार १५० चौरस मीटर क्षेत्रफळापर्यतच्या भूखंडावरील (Low risk Category) आणि १५० चौरस मीटर ते ३०० चौरस मीटर क्षेत्रफळापर्यतच्या भूखंडावरील (Moderate risk Category) इमारत बांधकामाकरिता परिशिष्ट (APPENDIX "K") मधील विहीत अटी व शर्तीच्या अधिन राहून परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. सदर बाब ग्राम विकास विभाग पत्र दि.२४ फेब्रुवारी, २०२१ (रत्नागिरी वगळता) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद व दि.१८ मार्च,२०२१ या शासन पत्रान्वये सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,व संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात आली आहे.

तसेच नगर विकास विभागाने दिनांक २८ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या अधिसूचनेनुसार महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४० अन्वये रत्नागिरी-सिंधुदुर्ग प्रादेशिक योजना क्षेत्रातील नियोजन प्राधिकरण नसलेल्या ग्रामपंचायतींना त्यांच्या क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित करण्यात आले असुन, या ग्रामपंचायतींना बांधकाम परवानगी अधिकार देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर जिल्हा परिषदेमध्ये नऊ संवर्गातील पदभरतीबाबत

**(२) २२३ (११-०४-२०२०). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषदेमध्ये १६४ कर्मचारी बोगस असून त्यातील १५५ हे प्राथमिक शिक्षक असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्हा परिषदेत नऊ संवर्गातील १६४ पदे प्रशासन भरणार असुन ही पदभरती पारदर्शक व्हावी यासाठी विविध पदनिहाय समित्या तयार करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पद भरतीच्या पहिल्या दिवशीच अल्प प्रतिसाद मिळाला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पदे भरणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०३-०१-२०२२) :** (१) नागपूर जिल्हा परिषदेत नऊ संवर्गातील एकुण १६८ कर्मचाऱ्यांनी अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नसल्यामुळे शासन निर्णय दिनांक २१/१२/२०१९ अन्वये कार्यवाही करण्यात आली आहे. त्यामध्ये १५५ प्राथमिक शिक्षकांचा समावेश होता.

(२) होय.

(३), (४) व (५) पदभरतीला अल्प प्रतिसाद मिळाला हे खरे नाही. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने नऊ संवर्गात १६८ पदे भरावयाची होती. यामध्ये शिक्षण सेवक (प्राथमिक) या संवर्गातील १५५ पदांचा समावेश होता. शिक्षण सेवक (प्राथमिक) या संवर्गातील २६ उमेदवारांसह एकुण ३५ उमेदवारांची संबंधित पदांवर नियुक्ती झालेली आहे. शिक्षण सेवक पात्रतेकरीता TET/CTET व TAIT परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक असल्यामुळे सदर पदाचे भरती करीता रिक्त पदांपेक्षा कमी उमेदवारांचे अर्ज पात्र ठरले. त्यापैकी बहुतांश उमेदवार पडताळणीअंती अपात्र ठरले आहेत. सदरप्रमाणे रिक्त राहिलेली पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## औंध (जि.पुणे) येथील उरो रुग्णालयाची झालेली दुरवस्था

**(३) १३०० (१३-०४-२०२०). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंध (जि.पुणे) येथील रुग्णालयात क्षयरोगाच्या उपचारासाठी अनेक रुग्ण येतात, मात्र रुग्णालय आणि परिसरात असलेली अस्वच्छता, सफाई कर्मचाऱ्यांचा अभाव, गळके पाईप, साचलेले पाणी यासारख्या कारणांमुळे रुग्ण बरे होण्याएवजी तेथील कर्मचाऱ्यांचेच आरोग्य धोक्यात आले असून हे रुग्णालय क्षयग्रस्त झाले असल्याचे माहे डिसेंबर २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले

(३) असल्यास, तदनुषंगाने उपरोक्त रुग्णालयातील क्षयरोग रुग्णांना पुरेशा सुविधा पुरविणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२४-०१-२०२२) :** (१), (२) व (३) उरो रुग्णालय, औंध पुणे ही ३ मजली इमारत असून या रुग्णालयाच्या इमारतीत आरोग्याशी निगडीत इतरही कार्यालये असल्यामुळे लोकांची नेहमी वर्दळ असते. सदर रुग्णालयातील वर्ग-४ कर्मचाऱ्यांची उपलब्धता कमी असल्याने वॉर्ड मधील स्वच्छतागृहाची व परिसरातील स्वच्छता रोजंदारीवर करुन घेण्यात येते.

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत उरो रुग्णालय परिसरातील सर्व साफ सफाई करण्यात आलेली आहे. तसेच पाईप गळती दुरुस्त करण्यात आलेली आहे. सदर रुग्णालयात तपासणीसाठी येणाऱ्या क्षय रुग्णांना आवश्यक ती सर्व औषधोपचार नियमित करण्यात येतात. क्षय रुग्णांना दाखल केल्यानंतर त्यांच्या थुंकी नमूने, क्ष-किरण तपासणी, ई.सी.जी. तपासणी व प्रयोगशाळेतील विविध तपासण्या मोफत केल्या जातात. तसेच आंतररुग्णांना नियमित उपचाराबरोबरच सकस आहार मिळण्याच्या दृष्टीने रोज सकाळी नाश्ता व चहा दुपारचे व सायंकाळचे जेवन मोफत दिले जाते. तसेच त्यांची रोगप्रतिकार शक्ती वाढविण्याकरीता प्रोटीन पावडर दिली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगांव (ता.लोणार, जि.बुलढाणा) येथील ग्रामपंचायत सचिव व सरपंच यांनी लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत**

**(४) १३४७ (१३-०४-२०२०). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगांव (ता.लोणार, जि.बुलढाणा) येथील ग्रामपंचायत सचिव व सरपंच यांनी लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी चौकशी करण्याची मागणी ग्रामपंचायत उपसरपंच व सदस्य यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांच्याकडे लेखी निवेदनानुसार केली असून चौकशी न झाल्यास दिनांक १६ डिसेंबर, २०१९ रोजीपासून बेमुदत उपोषणास बसण्याचा इशारा दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार संबधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०३-०१-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी गट विकास अधिकारी पंचायत समिती लोणार यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून, अनियमितता झाल्याचे आढळून आले आहे. सदर अनियमितता प्रकरणी रक्कम रु. ७७,८७१/- वसूल पात्र आढळून आली असून सदर रक्कम तत्कालीन ग्रामपंचायत सचिव व तत्कालीन सरपंच यांचेकडून वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खामगाव येथे जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे स्वतंत्र विभाग सुरु करण्याबाबत**

**(५) २५६३ (१२-०४-२०२०). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या विविध योजनेचा व्याप लक्षात घेता खामगाव येथे अतिरिक्त जिल्हा परिषद बांधकाम विभाग सुरु करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ डिसेंबर, २०१४ रोजीच्या पत्रानुसार मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलडाणा यांचा याबाबतचा प्रस्ताव पत्र क्र. ३१३८ दिनांक ७ सप्टेंबर, २०१४ रोजी शासनास सादर केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाप्रमाणे खामगाव येथे जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे स्वतंत्र विभाग येथे सुरु केल्यास घाटाखालील ६ तालुक्यातील प्रलंबित कामांना गती मिळेल, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्ताव तात्काळ मंजुर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (२१-१२-२०२१) :** (१) होय
(२) होय
(३) होय
(४) व (५) प्रस्तूत प्रकरणी वित्त विभागाने नवीन पदे निर्मितीसाठी बंदी घातली असल्याने जिल्हा परिषद अंतर्गत पदाचा आढावा घेऊन प्रस्ताव सादर करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

---

**चंद्रपूर जिल्हा परिषद अंतर्गत सातव्या वेतन आयोगाची पहिल्या हप्त्याच्या थकबाकीची रक्कम मिळण्याबाबत**

**(६) २८१२ (११-०४-२०२०). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हा परिषद अंतर्गत सातव्या वेतन आयोगाची पहिल्या हप्त्याची रक्कम सर्व कर्मचाऱ्यांना दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सेवा पुस्तकातील वेतन निश्चितीची पडताळणी न होणे, लेखा कोषागार कार्यालयाकडून उपस्थित केलेल्या आक्षेपाची पूर्तता करणे तसेच सन २०१९-२० शासनाकडून पुरेसे अनुदान प्राप्त न झाल्याने १५९ कर्मचाऱ्यांनी थकबाकी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (१०-०१-२०२२) :** (१), (२) व (३) जानेवारी, २०१६ ते डिसेंबर, २०१८ या कालावधीतील सातव्या वेतन आयोगाच्या थकबाकीची रक्कम पाच समान हप्त्यात अदा करण्याबाबतच्या निदेशानुसार माहे जून, २०१९ च्या वेतनामध्ये बहुतेक सर्व कर्मचाऱ्यांचे सातव्या वेतन आयोगाच्या प्रथम हप्त्याचे प्रदान झाले होते. तथापि, सेवा पुस्तकातील वेतन निश्चितीची पडताळणी न होणे, लेखा कोषागार कार्यालयाकडून उपस्थित केलेल्या आक्षेपाची पूर्तता करणे, तसेच सन २०१९-२० मध्ये शासनाकडून पुरेसे अनुदान प्राप्त न होणे, या कारणामुळे एकूण १५९ कर्मचाऱ्यांची थकबाकी अदा करणे प्रलंबित होते.

आता, उक्त १५९ कर्मचाऱ्यांपैकी फक्त १४ कर्मचाऱ्यांची सातव्या वेतन आयोगाच्या प्रथम हप्त्याची रक्कम प्रदान करणे प्रलंबित असून त्यानुषंगाने जिल्हा परिषद स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ससून सर्वोपचार रुग्णालय व बै.जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे या संस्थेच्या मालकीच्या जागेबाबत**

**(७) ४१६९ (२५-०३-२०२०). श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ससून सर्वोपचार रुग्णालय व बै.जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे या संस्थेच्या मालकीची २.१ एकर जागा ही राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थान (एन.आय.व्ही) पुणे या संस्थेस करारानुसार भाडेपट्याने दिलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भाडेपट्याचा करार सन २००१ रोजी संपुष्टात आल्याने सदरची जमीन ससून रुग्णालयाच्या ताब्यात देणेबाबत रुग्णालयाने जिल्हाधिकारी, पुणे व महाराष्ट्र शासनासोबत वारंवार पत्रव्यवहार केला असूनही सदरची जमीन ससून रुग्णालयाच्या ताब्यात देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ससून सर्वोपचार रुग्णालय व बै.जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे या संस्थेच्या मालकीची २.१ एकर जागा परत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (१७-१२-२०२१) :** (१) होय.

(२) होय.

(३) शासनाने राष्ट्रीय विषाणू भाडेपट्ट्याची मुदत सन २०१६ पासून पुढील १० वर्षासाठी वाढविली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खेड तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात कफ सिरपचा तुटवडा होत असल्याबाबत**

**(८) ४६२२ (१३-०४-२०२०). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री. अशोक पवार (शिरूर पुणे) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड तालुक्यातील अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रात गेल्या सहा महिन्यापासून कफ सिरप खोकल्याचे औषध मिळत नसल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेला हे औषध मिळत नसल्याने त्यांच्या आजारात वाढ होउन त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गंभीर बाबीकडे जिल्हा परिषदेच्या खेड तालुका आरोग्य प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय उपायोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (०३-०१-२०२१) :** (१) हे अंशतः खरे आहे.

सन २०१९-२० मध्ये राज्यस्तरावरुन कफ सिरपचा पुरवठा झाला नसल्याने काही प्रमाणात कफ सिरपचा तुटवडा जाणवला आहे.

(२) हे खरे नाही.

मासिक अहवालानुसार रुग्णांच्या संख्येत वाढ झालेली दिसत नाही.

(३) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरुन प्राप्त असलेल्या आर के एस निधीमधून वैद्यकीय अधिकारी यांना आवश्यकतेनुसार औषधे खरेदी करण्यास जिल्हास्तरावरुन सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) या व्यतिरिक्त जिल्हास्तरावरुन सेस निधीतून प्रति प्राथमिक आरोग्य केंद्राला रु.३५,०००/- इतके अनुदान औषध खरेदीसाठी वितरीत करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला येथील सर्वोपचार रुग्णालयात अत्यावश्यक औषधांचा पुरवठा होत नसल्याबाबत

**(९) ६७२० (१३-०४-२०२०). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने राज्यातील रुग्णालयांच्या मागणीनुसार औषध पुरवठा करण्याचा हाफकीनशी करार केला असला तरी अकोला येथील सर्वोपचार रुग्णालयात गेल्या वर्षापासून अत्यावश्यक औषधाचा पुरवठा होत नसल्याचे दिनांक १२ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे येथील सर्वसामान्य रुग्णांना औषधाविना परतावे लागत असून त्यांना बाहेरुन औषधे खरेदी करावी लागत असल्याने नाहक आर्थिक भुर्दंड पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रुग्णालयातील रुग्णांसाठी लागणाऱ्या अत्यावश्यक औषधांचा तातडीने व नियमीत पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अमित विलासराव देशमुख (१७-१२-२०२१) :** (१) नाही.

(२) व (३) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, अकोला येथ मे. हाफकीन महामंडळाकडून औषधांचा पुरवठा करण्यात येत आहे. तसेच तातडीची गरज असलेली औषधे संस्थास्तरावरुन स्थानिक खरेदी करुन रुग्णांवर उपचार करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्हा परिषद अंतर्गत आरोग्य विभागाच्या गट क व् ड मधील मंजूर रिक्त पदे भरणेबाबत.

**(१०) ११४२६ (०९-०९-२०२०). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा परिषद अंतर्गत आदिवासी व बिगर आदिवासी असे दोन भाग असून त्यापैकी आदिवासी भागातील आरोग्य विभागाचे गट क व ड या संवर्गातील पदे ही पेसा अंतर्गत भरलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बिगर आदिवासी भागातील २१३१ पदांना मंजुरी मिळालेली असून यापैकी १२४६ पदे भरण्यात आली असून ९०१ पदे अद्यापही रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यावर येणार अतिरिक्त ताण कमी व्हावा या दृष्टीकोनातून स्थानिक लोकप्रतिनिधीनी सदरचे रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणी माहे फेब्रुवारी २०२० मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे. हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१८-०१-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे. नाशिक जिल्हा परिषद अंतर्गत आदिवासी भागातील आरोग्य विभागाशी संबंधीत गट -क मधील आरोग्य सेवक(पुरूष) व आरोग्य सेविका (महिला) हे दोनच संवर्ग आहेत. आदिवासी क्षेत्रात आरोग्य सेवक (पुरूष) यांची मंजुर पदे १९८ असुन १७९ पदे भरली आहेत व १९ पदे रिक्त आहेत, तसेच आरोग्य सेविका (महिला) यांची मंजुर पदे ४८६ असुन ३२४ पदे भरली असुन १६२ पदे रिक्त आहेत. तसेच बिगर आदिवासी क्षेत्रात आरोग्य सेवक (पुरूष) यांची मंजुर पदे ३२१ असुन १६९ पदे भरली आहेत व १५२ पदे रिक्त आहेत, तसेच आरोग्य सेविका ( महिला) यांची मंजुर पदे ५८३ असुन २१७ पदे भरली व ३६६ पदे रिक्त आहेत.
(२) हे खरे नाही. नाशिक जिल्हा परिषद अंतर्गत आरोग्य विभागाशी संबंधित बिगर आदिवासी क्षेत्रातील आरोग्य सेविका (महिला) या संवर्गातील मंजुर पदे ५८३ असुन भरली पदे २१७ व ३६६ पदे रिक्त आहेत तसेच आरोग्य सेवक (पुरूष) या संवर्गातील मंजुर पदे ३२१ असुन भरली पदे १६३ व १५२ पदे रिक्त आहेत. हे दोन्ही मिळुन एकुण मंजुर पदे ९०१ असुन त्यापैकी भरलेली पदे ३८६ व रिक्त पदे ५१८ आहेत.
(३) व (४) जिल्हा परिषदेकडील आरोग्य विभागातील आरोग्य सेवक (पुरूष), आरोग्य सेविका (महिला), प्रयोग्शाळा तंत्रज्ञ, औषध निर्माता, आरोग्य पर्यवेक्षक या पाच संवर्गातील रिक्त पदे भरणेबाबतची व त्यासाठी परिक्षा आयोजित करण्याची कार्यवाही वित्त विभागाच्या मान्यतेनंतर सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सुरगाणा (जि.नाशिक) तालुक्यात मेडिसीन किट मध्ये झालेला गैरव्यवहार**

**(११) ११४३४ (०९-०९-२०२०). श्री.दिलीपराव बनकर (निफाड), डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) सुरगाणा (जि.नाशिक) तालुक्यात कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आशा सेविका व अंगणवाडी कर्मचारी याना सर्व्हेक्षणासाठी देण्यात आलेल्या मेडिसीन किटमध्ये गैरव्यवहार झाल्याची बाब माहे मे, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोना आजाराचा संसर्ग रोखण्यासाठी शासन विविध उपाययोजनांची प्रभावी अमलबजावणी करीत असताना सुरगाणा तालुक्यात मात्र सर्व्हेक्षणासाठी मुदतबाह्य औषधे नविन लेबल लावून खरेदी व वाटप केल्याचा प्रकार निदर्शनास आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार यामध्ये दोषी आढळलेल्या सबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२४-०१-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.

सदर बाब कोरोना या संसर्गजन्य आजाराशी संबंधित नाही. तथापि आशा स्वंयसेविका यांना ग्रामपंचायत मार्फत देण्यात आलेल्या ७ मेडिसीन किट मध्ये स्पिरिटच्या मुदत बाहय बाटल्या आढळुन आल्या आहेत हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे. याबाबत संबधितांस नोटीस देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अत्यावश्यक सेवेंसाठी पुणे शहराच्या नजिक अत्याधुनिक रुग्णालये उभारणेबाबत**

**(१२) १२०८३ (१७-०७-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी तसेच इतर आजारांच्या उपचारासाठी अत्यावश्यक सेवा मिळणेबाबत तसेच वाढती लोकसंख्येमुळे रुग्णांचे प्रमाण वाढत असल्यामुळे पुणे-मुंबई, पुणे-अहमदनगर, पुणे-सातारा, पुणे- सोलापूर या महत्वाच्या महामार्गावर पुणे नजिक अत्याधुनिक चार रुग्णालये उभारणे गरजेचे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयाकरीता गायरान तसेच शासकीय जागा उपलब्ध आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त महामार्गावर अत्याधुनिक चार रुग्णालये उभे करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (२४-०१-२०२२) :** (१), (२) व (३) कोरोना या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जिल्हा रुग्णालय, औंध, पुणे व ससून रुग्णालय, पुणे यांच्या स्तरावरुन आवश्यक ती उपाययोजना करण्यात येत आहे. कोरोना रुग्णावर उपचार करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत डेडिकेटेड कोविड हॉस्पीटल, डेडिकेटेड कोविड हॉस्पीटल सेंटर व कोविड केअर सेंटर या तीन स्तरावर विविध ठिकाणी कोविड सेंटर स्थापन करण्यात आली आहेत.

मुंबई पुणे महामार्गावर लोणावळा येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय व वडगाव मावळ येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित आहे. पुणे सोलापूर महामार्गावर इंदापूर येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय तसेच यवत व भिगवण येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित आहे. या रुग्णालयामार्फत आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या आंतरजिल्हा व जिल्हा अंतर्गत बदली धोरणाबाबत

**(१३) १२०९३ (११-०९-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर), डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हापरिषद प्राथमिक शिक्षकांच्या संगणकीय ऑनलाईन पध्दतीने होणाऱ्या आंतरजिल्हा व जिल्हा अंतर्गत बदलीसाठी शासनाच्या दिनांक ४ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या शासन निर्णयावर शिक्षण आणि शिक्षक संघटनांनी आक्षेप घेतले असून या निर्णयचा फेरआढावा घेण्यासाठी शासनाने एक अभ्यासगट गठीत केला असून त्याचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अभ्यास गटाने प्राथमिक शिक्षकांच्या बदली संदर्भात काही सुधारणा सुचविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पती-पत्नी एकत्रीकरणाचे सूत्र सांभाळावे, बदलीसाठी सेवाज्येष्ठता ठरवताना सध्याच्या शाळांमध्ये रुजू तारीख गृहीत धरावी, बदलीची टक्केवारी निश्चित करुन जिल्हा व तालुका स्तरावर बदल्या करण्यात याव्यात, फक्त विनंती बदल्या तालुक्याबाहेर व्हाव्यात अशा विविध सूचना शिक्षक संघटनांनी यामध्ये सूचविलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (०३-०१-२०२२) :** (१), (२), (३), (४) व (५) राज्यातील जिल्हापरिषद प्राथमिक शिक्षकांच्या संगणकीय ऑनलाईन पध्दतीने होणाऱ्या आंतरजिल्हा व जिल्हांतर्गत बदलीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पुणे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ४.२.२०२० च्या शासन निर्णयान्वये अभ्यासगट गठीत करण्यात आला. सदर अभ्यासगटाने राज्यातील जिल्हा परिषद शिक्षकांच्या विविध संघटनांशी चर्चा केल्यानंतर दिनांक १८.३.२०२० रोजी अहवाल शासनास सादर केला. सदर अहवालाच्या अनुषंगाने माझ्या दालनात दिनांक २१.१०.२०२० व २.२.२०२१ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये विस्तृत चर्चा करण्यात आली. त्यानंतर जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकांच्या आंतरजिल्हा व जिल्हांतर्गत बदल्यांबाबत शासन निर्णय दिनांक ७.४.२०२१ रोजी निर्गमीत करण्यात आला आहे.

---

## राज्यात महाराष्ट्र राज्य औद्योगिक वसाहतीतील कंपन्याचे टॅक्स पूर्णपणे स्थानिक ग्रामपंचायतींत वर्ग करणेबाबत

**(१४) १२१३५ (१४-०९-२०२०). श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल शेळके (मावळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र राज्य औद्योगिक वसाहतीतील कंपन्याचे टॅक्स यापूर्वी ग्रामपंचायतींत १०० टक्के जमा होत होता परंतु यामध्ये बदल होऊन कंपन्यांनी टॅक्स हा एमआडीसीला एकत्रीत जमा करुन एमआयडीसीकडून त्यातील ५० टक्केच टॅक्स ग्रामपंचायतीत जमा करण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या एमआयडीसी मधील कर्मचाऱ्यांना नागरी व इतर सोयीसुविधा पुरविण्याचे काम तेथील ग्रामपंचायत करत असल्याने त्यांचेवर ताण पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,या ग्रामपंचायतींना अधिक बळकटी देण्यासाठी व एमआयडीसीमधील ग्रामपंचायतीमध्ये रहिवास करणाऱ्या कामगारांच्या कल्याणासाठी १०० टक्के कंपन्यांचा टॅक्स ग्रामपंचायतींना वर्ग करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१८-०१-२०२२) :**(१) महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० मध्ये सुधारणा करण्यात आली असून ग्रामपंचायत हद्दीमधील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक वसाहतीतील जमीन, इमारती व मालमत्ता यांवरील सामान्य आरोग्य रक्षण उपकर (स्वच्छता कर) व दिवाबत्ती कर यांसहित मालमत्ता कर यांची वसुली ग्रामपंचायतीच्या वतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करण्याबाबत दिनांक दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ रोजीची शासन अधिसूचना निर्गमित करण्यात आली आहे. तसेच दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ च्या शासन निर्णयान्वये कर संकलन/वसुली संदर्भात अनुसरावयाच्या कार्यपदधतीबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

उक्त शासन अधिसूचनेन्वये/ शासन निर्णयान्वये ग्रामपंचायत हद्दीमधील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील जमीन, इमारती व मालमत्ता यांवरील सामान्य आरोग्य रक्षण उपकर (स्वच्छता कर) व दिवाबत्ती कर यांसहित मालमत्ता कर यांची वसुली ग्रामपंचायतीच्या वतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने करावयाची आहे आणि ५०% इतकी रक्कम स्वत: कडे ठेऊन उर्वरित ५०% इतकी रक्कम ग्रामपंचायतीस द्यावयाची आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने स्वत:कडे ठेवलेल्या ५० टक्के रकमेचा विनियोग हा या कर वसुलीकरिता येणारा प्रशासकीय खर्च आणि महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमामधील कलम ४५ मध्ये उल्लेख केलेल्या अनुसूची १ मधील ग्रामसूची मध्ये नमूद विषयांपैकी अ.क्र.२९,३१,३२,३९,४०, ४१,४५,५२,५३ मधील विषयांबाबत कार्यवाही करण्यासाठी करावयाचा आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची त्यांच्या क्षेत्रात सर्व प्रकारच्या सोयीसुविधा जसे की रस्ते,दिवाबत्ती, कचरा/घनकचरा व्यवस्थापन, गटारे, पाणीपुरवठा, अग्निशमन (उपलब्धतेनुसार) इत्यादी पुरवण्याची सर्वस्वी जबाबदारी आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌ववत नाही.

---

## कासा (ता. डहाणू जि.पालघर) येथे ग्रामपंचायतमार्फत ग्रामस्थांना वाटण्यासाठी मागविण्यात आलेल्या हॅन्ड सॅनिटायझर बॉटल जादा दराने विक्री करीत असल्याबाबत

**(१५) १२२१० (०९-०९-२०२०). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र व राज्य शासनाने सॅनिटायझर, मास्क यासारखे वस्तूचे दर निश्चित केले असतानाही डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील कासा ग्रामपंचायत मार्फत करोना विषाणुपासून बचाव करण्यासाठी ग्रामस्थांना वाटण्यासाठी मागविण्यात आलेल्याा ५० रुपये किमंत असणाऱ्या हॅन्ड

सॅनिटायझर बॉटलवर १९० रुपयाचे स्टीकर लाऊन विक्री करीत असल्याचे दिनांक २ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार नफेखोरी करणाऱ्या पुरवठादारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१७-०१-२०२२) :** (१) नाही, हे खरे नाही.
ग्रामपंचायतीने सुरुवातीला मागविलेले सॅनिटायझर बॉटल वाटप केल्यानंतर कमी पडलेल्या ५०० नग बॉटल बालाजी सप्लायर्स यांच्याकडून मागविणेत आले होते. ते बंद बॉक्समध्ये पुरविणेत आले. बंद बॉक्समध्ये पुरविणेत आलेल्या बॉटलवर १९०/- रुपये किंमत असल्याचे लक्षात आल्याने संबंधित सप्लायर्स यांना परत करणेत आले आहे. सदरच्या सॅनिटायझर बॉटल ग्रामपंचायतीने खरेदी केल्या नाहीत.
(२) सदर प्रकरणी चौकशी करणेत आलेली आहे. चौकशीत ग्रामपंचायतीने शासनाने ठरवून दिलेल्या दरापेक्षा जास्त दराने हॅन्ड सॅनिटायझर खरेदी केले नसल्याचे दिसून आले.
(३) सदरच्या सॅनिटायझर बॉटल ग्रामपंचायतने खरेदी केलेल्या नसल्यामुळे ग्रामपंचायतीचे कोणतेही नुकसान झालेले नाही. त्यामूळे पुरवठादारावर कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## मुखेड (जि.नांदेड) पंचायत समिती स्तरावरीत जिल्हा परिषद आदर्श शिक्षक पुरस्कार प्रलंबित असल्याबाबत

**(१६) १२६५८ (१३-०९-२०२०). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुखेड (जि.नांदेड) पंचायत समिती स्तरावरील ५ सप्टेंबर या शिक्षक दिनाच्या दिवशी दिला जाणारा गुरुगौरव पुरस्कार मागील ४ वर्षापासून प्रलंबित असून त्या संबंधीचे निवेदन शिक्षक संघटना व स्थानिक लोकप्रतिनिधींना देऊनही पुरस्काराचे वितरण होत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधित अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०३-०१-२०२२) :** (१) व (२) पंचायत समितीच्या सेस फंडातून पुरस्कार वितरणासाठी निधी मिळण्याकरिता सभेची मान्यता न मिळाल्याने सन २०१५-१६ ते २०१९-२० या कालावधीत मुखेड स्तरावरुन पुरस्कार वितरीत करण्यात आलेले नाहीत. तसेच सन २०१९-२० या वर्षीच्या पुरस्कार वितरणाबाबत कोविड-१९ या महामारीच्या संक्रमणाच्या पार्श्वभूमीवर

राज्यात करण्यात आलेल्या टाळेबंदीमुळे कार्यवाही करता आलेली नाही. पुरस्कार वितरणासाठी निधी उपलब्ध झाल्यानंतर तसेच टाळेबंदीचे निर्बंध शिथिल झाल्यानंतर, मागील प्रलंबित आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**नागपूर जिल्हा परिषदेमधील ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील अभियंत्याने केलेला गैरव्यवहार**

**(१७) १२६९७ (१६-०७-२०२०). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा परिषद, नागपूर येथील ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील अभियंता श्री.विजय विष्णुजी टाकळीकर यांना दोन लाखाची लाच घेताना लाचलुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी रंगेहाथ पकडल्याची घटना माहे जून, २०२० च्या पहिल्या आठवड्यात घडली असून देखील अद्यापपर्यंत संबधित अभियंत्यास निलंबित करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधीत अभियंत्याची यापूर्वी सन २०१८ मध्ये जिल्हा परिषदेतील पाईप खरेदीत लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्या प्रकरणाची चौकशी आजतागायत पूर्ण झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणा संदर्भात संबधित अभियंत्यावर तातडीने निलंबनाची कारवाई करून सदरहू प्रकरणांची चौकशी करण्याबाबत आजमितीस शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ (०४-१-२०२२) :** (१) नाही
(२) नाही
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर मध्ये उपचाराविना रुग्णाचा मुत्यू झाल्याबाबत**

**(१८) १२९७५ (१४-०९-२०२०). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथे श्वसनाचा त्रास होणाऱ्या एका रुग्णास रुग्णालयात बेड उपलब्ध नसल्याचे सांगून रुग्णालयाने दाखल करुन घेण्यास नकार दिल्यामुळे मृत्यू झाला असल्याचा आरोप कुटुंबीयांकडून होत असल्याचे दिनांक २७ जून २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उल्हासनगर येथे रेडक्रॉस आणि इतर रुग्णालय मध्ये अपु-या सोयी- सुविधा असून रुग्णांना बेड उपलब्ध नसल्याचे सांगितले जात असून काही मोजक्याच लोकांना बेड उपलब्ध करून दिले जात असल्याचा आरोप लोकप्रतिनधी कडून केला जात असून दाखल असलेल्या रुग्णांना कोणतीही सोयसुविधा उपलध होत नसल्याने निदर्शनास आले आहे, हे हीखरे आहे काय,

(३) असल्यास, येथे आरोग्य अधिकारी उक्त परिस्थिती हाताळण्यास अपयशी ठरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उल्हासनगर मध्ये रुग्णांना बेड उपलब्ध होण्यासाठी आणि विविध आरोग्य सेवा पुरविण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२४-०१-२०२२) :** (१),(२),(३) व (४) उल्हासनगर महानगरपालिकांतर्गत एकूण ३ कोविड सेंटर कार्यान्वित होते. त्यातील रेड क्रॉस कोविड केअर सेंटर उल्हासनगर-३ हे २५ खाटांचे रुग्णालय असून दिनांक २७ जून, २०२० रोजी सदर रुग्णालयात २ बेड उपलब्ध होते. यामुळे बेड उपलब्ध नसल्याबाबत कोणत्याही रुग्णाला अथवा रुग्णांच्या नातेवाईकांना सांगण्यात आलेले नाही.

रेड क्रॉस कोविड केअर सेंटर उल्हासनगर-३ व इतर कोविड केअर सेंटरमध्ये उल्हासनगर महानगरपालिकांतर्गत दिवसरात्र वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी कार्यरत असून तेथे दाखल रुग्णावर योग्य ते औषधोपचार करण्यात येतात. तसेच ठराविक लोकांनाच बेड उपलब्ध करुन दिले जात असल्याबाबत लोकप्रतिनिधींकडून तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत.

जिल्हाधिकारी, ठाणे यांनी आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांना साथरोग प्रतिबंध कोविड १९ काळात “सक्षम अधिकारी” म्हणून घोषित केल्याने सदरील कोविड-१९ रुग्णालये आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांच्या देखरेखीखाली सुरु होते. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांच्या मार्गदर्शनान्वये संबंधित वैद्यकीय अधिकारी योग्य ते नियोजन करुन कोविड केअर सेंटर मध्ये रुग्णांना उपचार व सुविधा पुरवत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मासा (ता.जि. अकोला) येथे जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने अतिक्रमित जागेवर बांधकाम केल्याबाबत

**(१९) १३२५५ (११-०९-२०२०). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मासा (ता.जि. अकोला) येथे नळपाणी पुरवठा योजनेच्या विहीरीचे बांधकाम ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद अकोला यानी पाटबंधारे विभागाच्या जागेवर अतिक्रमीत करुन केल्याने पाटबंधारे विभागाने सदर ग्रामीण पाणी पुरवठा विभागावर नोटीस बजावली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त, प्रकरणी पाटबंधारे विभागाने सदर पाणी पुरवठा योजनेस धरण सुरक्षीतेच्या नियमानुसार २०० मीटर अंतराच्या बाहेर विहीर खोदकामाची परवानगी दिली आहे, ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी धरण सुरक्षीतेच्या दृष्टीने सदर खोदकाम केलेली विहीर बुजवण्याचे आदेश पाटबंधारे विभागाने दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (०३-०१-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सहायक अभियंता श्रेणी १ पाटबंधारे उपविभाग यांच्या दि.२९.०६.२०२० रोजीच्या पत्रान्वये, पोलीस निरीक्षक बोरगाव मंजु यांना निर्देशित केल्याप्रमाणे संबंधित सरपंच, कंत्राटदार व शाखा अभियंता यांचेवर फौजदारी कार्यवाही करून गुन्हे दाखल केले आहेत व सद्यस्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा परिषद जळगाव मधील आरोग्य कर्मचारी यांना पदोन्नती व कालबद्ध पदोन्नतीचा लाभ मिळण्याबाबत**

**(२०) १४५४४ (११-०९-२०२०). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा परिषद जळगाव मधील आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, आरोग्य सहाय्यिका, आरोग्य सहाय्यक यांच्या कालबद्ध पदोन्नतीचा पहिला लाभ २० वर्ष पूर्ण होऊन व दुसरा लाभ ३० वर्ष पूर्ण होऊन मिळालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच आरोग्य कर्मचारी यांच्या पदोन्नती प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार आरोग्य कर्मचारी यांच्या पदोन्नती व कालबद्ध पदोन्नतीचा लाभ प्रलंबित ठेवणाऱ्या दोषी कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१०-०१-२०२२) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सहाय्यिका यांना दिनांक २९/१०/२०२१ रोजी पदोन्नतीचा लाभ मंजूर करण्यात आला आहे. तसेच, जिल्हा परिषदेमध्ये आरोग्य विभागांतर्गत कार्यरत पात्र कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नतीचा लाभ देण्याची कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावर सुरु आहे.
(३) पदोन्नती व कालबध्द पदोन्नतीचा लाभ प्रलंबित ठेवणाऱ्या दोषी कर्मचाऱ्यांवर दिनांक १०/०६/२०२१ व दिनांक १४/०६/२०२१ रोजी निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयातील कोरोना उपाय योजनसाठी खरेदी केलेल्या साहित्यामध्ये झालेला अपहार**

**(२१) २०२५९ (१३-१२-२०२०). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार शासकीय रुग्णालयात कोरोना उपाय योजनसाठी शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी देण्यात आला असून या निधीतून अद्ययावत असा कोरोना दालन (वॉर्ड) तयार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वॉर्डांमध्ये रुग्णांसाठी १० खाटा खरेदी करण्याची कार्यादेश (वर्क ऑर्डर) देण्यात आले होते परंतु सद्यस्थितीत या दालनात नव्याने खरेदी करण्यात आलेल्या दोनच खाटा उपलब्ध आहेत तसेच १० खाटा खरेदीच्या किमतीमध्ये ही तफावत आढळून आल्याने यामध्ये अपहार झाल्याची बाब दिनांक २४ नोव्हेबर, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयाला शासनाकडून किती निधी प्राप्त झाला तसेच कोरोना दालनात १० खाटा खरेदी करण्याचा उल्लेख कार्यादेश (वर्कऑर्डर) मध्ये नमूद करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२०-१२-२०२१) :** (१) होय.

(२) नाही

(३) छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार शासकीय रुग्णालय, सोलापूर येथे ३०० खाटांचे अद्ययावत कोविड रुग्णालय निर्माण करण्याकरीता जिल्हा नियोजन समितीमार्फत सन २०१९-२० मध्ये रु. १६१.६९ कोटी इतका निधी प्राप्त झाला आहे. सदर रुग्णालयाकरीता १० खाटा खरेदी करण्याचा उल्लेख कार्यादेश (वर्कऑर्डर) मध्ये नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयातील गैरकसाभाराबाबत.**

**(२२) २०२६० (१९-०३-२०२१). श्री.विजयकुमार देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय येथे कोरोना रुग्णांची देखभाल करण्यासाठी रुग्णालयाचे प्रमुख आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता यांनी रुग्णालयामधील कामे करण्यासाठी रुग्णालयाची यंत्रणा असतानाही बेकायदेशीरपणे खाजगी दलालांची नेमणूक केली असून त्यास महाराष्ट्र शासनाचे ओळखपत्र दिल्याचे दिनांक १७ जून, २०२० रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास खाजगी व्यक्तीला महाराष्ट्र शासनाचे ओळखपत्र देण्याचा अधिकार अधिष्ठाता यांना आहे काय तसेच खाजगी व्यक्तीस अधिष्ठाता यांच्या शासकीय निवासस्थानी मुक्काम करता येतो काय,

(३) तसेच, आस्थापनेवर नसलेली व्यक्ती रुग्णालयातील कार्यक्रमात सहभाग आणि पुढाकार घेऊ शकते काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, त्यानुसार संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२०-१२-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही. कोविड-१९ संसर्ग झालेल्या रुग्णांच्या ज्या चाचण्या छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात उपलब्ध नव्हत्या, त्या चाचण्या खाजगी प्रयोगशाळेतून करुन घेण्याकरीता रक्ताचे नमूने ने-आण करण्यासाठी एका खाजगी व्यक्तीस अधिष्ठाता यांनी रुग्णसेवेस व्यत्यय व गैरसोय होऊ नये म्हणून प्रवेश ओळखपत्र दिले होते.
(३) सदर व्यक्ती रुग्णालयातील कोणत्याही कार्यक्रमात सहभागी नव्हती.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मावळ (जि.पुणे) तालुक्यातील पवना धरणाच्या परिसरातील गावातील पूरग्रस्तांचे पुनर्वसन करणेबाबत

**(२३) २०३६९ (०८-०१-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मावळ (जि.पुणे) तालुक्यात शेती व पिण्यासाठी तसेच पिंपरी-चिंचवड परिसराला व औद्योगिक वसाहतींना पाण्याची आवश्यकता असल्याने सन १९६३ साली पवना धरणाचे बांधकाम सुरु करण्यात आले, हे खरे आह काय,
(२) असल्यास, सदर पवना धरण प्रकल्पासाठी काले, ब्राह्मणोली, ठाकुरसाई, गेव्हंडे खडक, जवण, कादव, वाघेश्वर, चावसर, केवरे, आपटी, कोळे, चाफेसर, आटवन, फांगणे, आंबेगाव, शिंदगाव, माजगाव, पाले आदी गावातील १२०३ खातेदारांच्या जमिनी ताब्यात घेण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील ५५ वर्षांपासून पवना धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्न पवना धरणाच्या परिसरातील अतिरिक्त जमिनीच्या मोजणी अभावी प्रलंबित असल्याने पवना धरण ग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी बाधित व नागरिकांनी वेळोवेळी आंदोलने करुन अतिरिक्त जमिनीची मोजणी करण्याची जलसंपदा विभागाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच पवना धरणाच्या खातेदार यादीत पूररेषा अतिरिक्त जमीन मोजणीची आकडेवारी याबाबत अद्यावत माहिती धरणग्रस्तांना उपलब्ध नसल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, खडकवासला पाटबंधारे विभागाच्या वतीने पवना धरणाच्या अतिरिक्त जमिनीच्या मोजणीचा अहवाल जिल्हाधिकारी पुणे यांच्याकडे सादर करण्यात आला आहे काय,
(६) असल्यास, सदर अहवालातील निष्कर्षानुसार पवना धरणाच्या परिसरातील अतिरिक्त जमीनीवर काले, ब्राह्मणोली, ठाकुरसाई, गेव्हंडे खडक, जवण, कादव, वाघेश्वर, चावसर, केवरे, आपटी, कोळे, चाफेसर, आटवन, फांगणे, आंबेगाव, शिंदगाव, माजगाव, पाले आदी गावातील १२०३ खातेदार पूरग्रस्तांचे पुनर्वसन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील (२२-०१-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) हे खरे नाही.
अतिरिक्त जमिनीची मोजणी करण्यात आली असून त्याची पडताळणी करण्यासाठी मोजणीचा सविस्तर अहवाल कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे यांनी जिल्हापुनर्वसन अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी, पुणे यांना दि.२०/१०/२०२० च्या पत्रान्वये सादर केला आहे.
(६) पवना प्रकल्पातील उपलब्ध जमिनीची तपासणी करुन पवना प्रकल्पग्रस्तांना जमीन वाटप करणेप्रकरणी पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे असे महसूल व वन विभागाचे अभिप्राय आहेत.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात नवीन सांस्कृतिक धोरण तयार करण्यात येत असल्याबाबत**

**(२४) २७२०४ (१५-०६-२०२१). श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात “सन २०१० मध्ये अंमलात आलेल्या सांस्कृतिक धोरणात व्यापक बदल करून शासनाचे नवीन सांस्कृतिक धोरण जाहीर करण्यात येईल” असे मा.सांस्कृतिक कार्य मंत्री यांनी दिनांक १५ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास जाहीर केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर धोरण ठरविण्यासाठी राज्यस्तरावर समिती नियुक्त करुन कालबध्द कार्यक्रमांतर्गत या समितीने शासनास शिफारशी अहवाल सादर करावा असे ही सांस्कृतिक कार्य मंत्री यांनी जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू धोरण तयार करताना राज्यातील लोककला, मातृभाषेत निर्माण होणारे विविध कलाविष्कार यांना प्रोत्साहन मिळावे याकरिता विशेष तरतूद तसेच मुंबईच्या गोरेगाव परिसरातील फिल्मसिटी आंतरराष्ट्रीय दर्जाची व्हावी याकरिता विकास आराखडा तयार करणे व मराठी चित्रपटांना प्राईम टाईमच्या वेळेत चित्रपट गृह उपलब्ध होणे याकरीता काही तरतूद करण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, नवीन सांस्कृतिक धोरण ठरविण्यासाठी शासनाने समिती स्थापन केली आहे काय व कधी तसेच समितीची कार्यकक्षा, अहवाल सादर करण्याबाबतचा कालावधी याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२१-१२-२०२१) :** (१) होय.

(२) होय.

(३) गोरेगांव चित्रनगरीच्या विकास आराखडयाबाबत कार्यवाही सुरु असून मराठी चित्रपटांना प्राईम टाईमच्या वेळेत चित्रपटगृह उपलब्ध करुन देण्याची बाब “महाराष्ट्र चित्रपट धोरण” मध्ये प्रस्तावित आहे.

(४) व (५) राज्याचे नवीन सांस्कृतिक धोरण ठरविण्यासाठी समितीची स्थापना करण्याची बाब प्रस्तावित असून तदनंतर समितीची कार्यकक्षा, अहवाल सादर करण्याचा कालावधी इत्यादी बाबत निर्णय घेण्यात येणार आहे.

---

**रायगड जिल्हा परिषदेच्या सेवेतील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या भरती प्रकियेत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२५) २७२१७ (१५-०६-२०२१). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.दिलीपराव बनकर (निफाड) श्री. योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हा परिषदेच्या सेवेतील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या भरती प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्ग ३ संवर्गाच्या पदावर १० टक्के आरक्षणानुसार सरळसेवा भरती करण्याचा शासनाचा नियम असताना सेवाजेष्ठता कर्मचाऱ्यांना डावलण्यात आले असल्याने तसेच जिल्हा परिषदेच्या ग्रामंपाचयत विभागाने वर्ग ३ पदाच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती चुकीच्या पद्धतीने केली जात असल्याने दिनांक १ जानेवारी, २०१९ च्या अंतिम सेवा ज्येष्ठता यादीनुसार भरती करण्याची मागणी जिल्हा परिषद सदस्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषदेने माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान प्रसिध्द केलेल्या यादीत फक्त बारावी आणि पदवीधर कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली असून १५ ते २० वर्षे काम करणाऱ्या १० वी पास कर्मचाऱ्यांना नियुक्तीपासून दूर ठेवण्यात आले असल्याने सदर भरती प्रकियेची चौकशी करण्याची मागणी जिल्हा परिषद सदस्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेतील ग्रामपंचायत विभागातील कर्मचाऱ्यांची भरती करण्याचा पुर्नविचार करुन नियमबाह्म भरती करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ (१८-०१-२०२२) :** (१) हे खरे नाही. रायगड जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामपंचायत कर्मचारी भरती करण्यात आलेली नसुन अद्याप भरती प्रक्रिया पुर्ण झालेली नाही.

(२)  अशत: खरे आहे. या अनुषंगाने मा. विजय भोईर, जिल्हा परिषद सदस्य, रायगड यांनी दिनांक २२.०३.२०२१ रोजी जिल्हा परिषद स्तरावर पत्र व्यवहार केला आहे.
(३) हे खरे नाही. रायगड जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामपंचायत कर्मचारी भरती करण्यात आलेली नसुन अद्याप भरती प्रक्रिया पुर्ण झालेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खाजगी वैद्यकीय महाविद्यालये विद्यार्थ्यांकडून अतिरिक्त**
**शुल्क आकारणी करत असल्याबाबत**

**(२६) २७५०६ (११-०६-२०२१). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडुन करण्यात येत असलेली बेकायदा अतिरिक्त शुल्क वसुली थांबविण्याचे आदेश दि.२२ मार्च, २०२१ रोजी वा त्या सुमारास शुल्क नियामक प्राधिकरणाने, महाविद्यालयांना दिले आहेत,  हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१५ ते २०२१ या कालावधीत विद्यार्थ्यांना प्रवेश देताना शिक्षण पुर्ण झाल्यावर महाविद्यालय सोडताना परत करण्याच्या (कॅाशन मनी) च्या नावाखाली प्रति विद्यार्थी तीन लाख रुपये तर डॉक्टर्स क्लबच्या नावाखाली प्रति विद्यार्थी एक लाख रुपये प्रमाणे आतापर्यंत सुमारे १०० कोटीहून अधिक जमा केलेली रक्कम,खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना परत केली नसल्याचेही निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील सर्व खाजगी वैद्यकीय महाविद्यालंयाचे लेखा परीक्षण करुन विद्यार्थ्यांकडून घेतलेले शुल्क तात्काळ परत करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास. उपरोक्त प्रकरणी अतिरिक्त शुल्क किती महाविद्यालयांनी परत केले व ज्या महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना परत केले नाही, अशा महाविद्यालयांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास. विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अमित विलासराव देशमुख (२४-१२-२०२१) :** (१)नाही.
(२) अंशत:खरे आहे.
(३) शुल्क नियामक प्राधिकरण यांच्या स्तरावर कार्यवाही/तपासणी सुरु आहे.
(४) अद्याप कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोरोना विषाणूच्या संसर्गामुळे जाहीर करण्यात आलेल्या टाळेबंदीच्या काळात देहविक्री करण्या-या महिलांना उदरनिर्वाहाकरिता मिळण्या-या अनुदानात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२७) २८५२९ (१५-०६-२०२१). श्रीमती मुक्ता टिळक (कसबापेठ), श्री.शिरीष चौधरी (रावेर) श्रीमती सरोज अहिरे (देउळी):** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने देहविक्री करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करणा-या महिलांना कोरोना विषाणूच्या संसर्गामुळे जाहीर करण्यात आलेल्या टाळेबंदीच्या काळात शिधा व रोख रक्कम बँक खात्यात अनुदान रुपात जमा करण्याचे आदेश देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्ह्यातील देहविक्री करणा-या महिलांना कोरडे शिधा व उदरनिर्वाहाकरिता दर महा ५०००/- रुपये तसेच शाळेत जाणारी मुले असलेल्या देहविक्री करणा-या महिलांना दर महा ७५००/- रुपये देण्याचे महिला व बालकल्याण विकास विभागाच्या वतीने जिल्हाधिकारी, पुणे यांनी आदेश दिले होते तसेच टाळेबंदीच्याच्या काळात या महिलांचा सर्वे जिल्हा बाल विकास अधिकारी, पुणे यांच्या मार्फत करून माहे ऑक्टोबर ते डिसेंबर, २०२० या काळात अनुदानाचे वाटप करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे येथील बुधवार पेठ येथील कायाकल्प संस्थेच्या वतीने अर्ज भरून अनुदान जमा करणेबाबत सहायता करण्यात आली होती तसेच या संस्थाकडून मोठ्या प्रमाणावर देशातील व परदेशातील लोकांकडून व संस्थांकडून लाखो रुपयांचे अनुदान जमा करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर संस्थेच्या वतीने देहविक्रि न करणा-या परंतु गरीब अशिक्षित महिलांकडूनही अर्ज भरून त्यांना बोगस लाभार्थी दाखवून अनुदान देण्यात आल्याची घटना माहे मे, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली असून सदर संस्थेच्या वतीने अनुदानातील निम्मी रक्कम परत मागितल्याची घटना देखील निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सामाजिक संस्थेच्या नावाखाली शासकीय अनुदानातील पैसे घेण्यात येण्या-या प्रकरणांची चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर संस्थाचे लेखापरीक्षण करण्यासह संस्थेची मान्यता रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२३-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

गृह विभागाच्या दि.२८/०९/२०२० च्या परिपत्रकान्वये तसेच महिला व बालविकास विभागाच्या दि.२६/११/२०२०च्या शासन निर्णयान्वये, National Aids Control Organization या संस्थेकडून वेश्या व्यवसायात कार्यरत ओळख निश्चित केलेल्या महिलांना दर महा ५०००/- रुपये तसेच शाळेत जाणारी मुले असलेल्या देहविक्री करणाऱ्या महिलांना दर महा ७५००/- रुपये देण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्या आदेश क्र.१४१६ दि.४/०२/२०२१ अन्वये १९२४ वेश्या व्यवसाय करणा-या महिलांना व आदेश क्र. १९४८ दि.१९/०४/२०२१ अन्वये ३५३१ वेश्या व्यवसाय करणा-या महिलांना अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले आहे.

(३) हे अंशतः खरे आहे

पुणे येथील कायाकल्प संस्थेने बुधवार पेठ परिसरातील अतिजोखिम गटातील महिलांना अर्थसहाय्य मिळण्याबाबत मदत केली होती.

(४) होय, हे खरे आहे.

वर्तमानपत्रातील प्रसिध्द बातमीनुसार तसेच सामाजिक कार्यकर्त्यांकडून प्रसिध्द बातमीनुसार तसेच सामाजिक कार्यकर्त्यांकडून यासंदर्भात जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने ही घटना निदर्शनास आली आहे.

(५) सदर तक्रारीच्या अनुषंगाने संबधित व्यक्तींवर पोलीस स्टेशन, पुणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, पुणे यांनी आदेश क्रं. कॅश/ कावि/ १९३/ २०२१ दि. १२.०५.२०२१ अन्वये उप विभागीय अधिकारी, पुणे विभाग, पुणे यांचे अध्यक्षतेखालील समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर चौकशी समितीकडून चौकशी बाबत कार्यवाही सुरु आहे. महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी अंतर्गत कायाकल्प संस्था, पुणे द्वारे देह विक्री करणा-या महिलांकरिता दोन प्रकल्प राबविण्यात येत होते. सदर प्रकरणाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटीद्वारे दि.९ जून २०२१ रोजी चौकशी करून चौकशी अहवालाच्या आधारे दि.३० जून, २०२१ रोजी सदर संस्थेच्या दोन्ही प्रकल्पांची मान्यता रद्द करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र शासनाच्या मनुष्यबळ क्रीडा खात्यातील क्रीडा प्रबोधिनीतबाबत

**(२८) २८५३० (२१-०६-२०२१). श्रीमती मुक्ता टिळक (कसबापेठ) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या म्हाळुंगे बालेवाडी येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा नगरी, क्रीडा प्रबोधिनीत, क्रीडा वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सुविधांमध्ये कोणत्या वैद्यकीय सेवा उपलब्ध असून त्यासाठी सन २०१९-२०२० व २०२०-२०२१ या कालावधीत किती खर्च करण्यात आला आहे, तसेच सदर सुविधांचा योग्य वापर होण्यासाठी आवश्यक ते मनुष्यबळ क्रीडा खात्याकडे उपलब्ध असल्यास सुविधांचा फायदा कोणत्या क्रीडा प्रकारच्या खेळाडूंनी घेतला आहे,

(३) असल्यास, क्रीडा प्रबोधिनीतील खेळाडूंची गुणवत्ता वाढण्यासाठी आवश्यक असणारे क्रीडा मानसशास्त्रज्ञ (sports psychologists), क्रीडा प्रशिक्षक (sports trainers), क्रीडा विश्लेषण (sports analysers) आदि पदे (schedule) वेळापत्रक मान्य आहेत काय,

(४) असल्यास, सदर पदांची भरती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुनिल केदार (२३-१२-२०२१) :** (१) व (२) शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे, बालेवाडी, पुणे येथील स्पोर्टस सायन्स सेंटरमध्ये वैद्यकीय उपचार भौतिकोपचार,लो ऑक्सिजन चेंबर

इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत. स्पोर्टस सायन्स सेंटरकरीता सन २०१८-१९ मध्ये उपकरणे व साहित्य खरेदीसाठी रु.१४.६४ लक्ष इतका खर्च करण्यात आला आहे. या सुविधांचा फायदा क्रीडा प्रबोधिनीतील ॲथलेटीक्स, सायकलींग, ज्युडो, शुटींग, वेटलिफ्टिंग, स्वीमिंग, टेबल टेनिस, जिमनॅस्टीक्स, हॉकी, फुटबॉल, इत्यादी खेळातील खेळाडूंनी घेतला आहे.
(३) व (४) क्रीडा प्रबोधिनींकरीता क्रीडा प्रशिक्षक, सहायक मार्गदर्शक, फिजिओथेरीपीस्ट, क्रीडा मानसशास्त्रज्ञ, आहार सल्लागार इत्यादी पदे खेळाडू संख्येच्या आधारावर ठरविण्यात आली आहेत.सदर पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कारंजा व मानोरा (जि. वाशिम) तालुक्यांतील कृषी विभागाची कामे यंत्राद्‌वारे केल्याबाबत**

**(२९) २८९४१ (१०-०६-२०२१). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कारंजा, मानोरा (जि. वाशिम) तालुक्यांतील कृषी विभागामार्फत माहे मार्च, २०२१ मध्ये मजूर सहकारी संस्थांमार्फत करण्यात आलेले काम शासनाचे कोणतेही निर्देश नसताना मजुरांमार्फत न करता विविध यंत्राद्‌वारे करत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषी विभागाकडे याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी शासनाचा नियम डावलून यंत्रामार्फत काम केल्याबाबतची तक्रार करुन कृषी विभागाच्या अधिकारी यांच्या निदर्शनास आणुन दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बाब निदर्शनास आल्यानंतर जिल्हा कृषी अधिकारी यांच्या मार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,
(४) असल्यास, त्यानुसार दोषी आढळून आलेल्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख (१४-०१-२०२२) :** (१) नाही.
सन २०२०-२१ या कालावधीत मंजूर सहकारी संस्थेस एकूण-४९ कामे देण्यात आली असून त्यापैकी आयडब्ल्यूएमपी अतंर्गत सिनाबा खोलीकरण-१ काम पूर्ण करण्यात आले. तसेच उर्वरित-४८ कामापैकी गॅबियन बंधारे-४१ कामे, ढाळीचे बांध-४, डिप सिसिटी-३ कामे पोक्रा अतंर्गत पुर्ण करण्यात आली आहेत.
(२) नाही.
मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व जिल्हा कृषी अधिकारी, वाशिम या कार्यालयास कोणतेही निवेदन/तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३) (४) व (५) प्रश्न उद्‌द्‌भवत नाही.

---

**पिंजाळ (ता.वाडा) गावातील एका फार्महाऊस मालकाने नदीच्या आत खोदकाम करुन अनधिकृत बांधकाम केल्याबाबत.**

**(३०) ३०९४० (१३-०७-२०२१). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंजाळ (ता.वाडा) गावातील एका फार्महाऊस मालकाने नदीच्या आत खोदकाम करुन अनधिकृत संरक्षक भिंत उभारण्याचे काम केल्याचे माहे एप्रिल-मे, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फार्महाऊसच्या मालकाने पोकलेन मशीन यंत्राच्या सहाय्याने नदीपात्र पोखरुन नदीचा नैसर्गिक प्रवाह बदला असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी पिंजाळ नदीपात्रात अनधिकृत बांधकाम करणा-या संबंधितांवर शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बाळासाहेब थोरात (२०-०१-२०२२) :** (१), (२), (३) व (४) मौजे पिंजाळ, ता. वाडा येथील ग्रामस्थांनी गावातील एका फार्महाऊस मालकाने नदीच्या आत खोदकाम करुन अनधिकृत बांधकाम केल्याबाबत व अवैध उत्खननाबाबत दिनांक २२.०६.२०२१ रोजी तहसिलदार, वाडा यांचेकडे तक्रार दाखल केली आहे.

तहसिलदार, वाडा यांनी तलाठी सझा गारगांव यांचे मार्फत तपासणी केली असता मौजे पिंजाळ येथे संरक्षक भिंतीचे बांधकाम केलेले दिसून आले आहे. नदीपात्रात केलेल्या बांधकाम / अतिक्रमण दूर करण्याबाबत तहसिलदार, वाडा यांनी श्री. प्रमोदभाई जगमोहनदास संघवी व इतर ३ यांना दिनांक ०१.११.२०२१ अन्वये नोटीस बजावण्यात आली होती. सदर नोटीसच्या खुलाश्यामध्ये श्री. संघवी यांनी पिंजाळ नदीच्या पात्रात अतिक्रमण केले नसल्याचे कायदेशीर हद्द कायम करुन घेणेबाबत भूमी अभिलेख, वाडा यांचेकडून मोजणी करण्याकरिता अर्ज केला असून सदर हद्द कायम होईपर्यंत संरक्षण भिंतीचे काम बंद करणार असल्याबाबत कळविले आहे.

सद्यस्थितीत संरक्षण भिंतीचे काम बंद असून, मोजणी पूर्ण झाल्यानंतर नदीपात्रात बांधकाम असल्यास सदर बांधकाम निष्कासित करण्यात येईल.

---

**बांधकाम मजुरांप्रमाणे इतर असंघटित कामगारांना दर्जा देणे व आर्थिक पॅकेज देणेबाबत**

**(३१) ३२२४८ (०५-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतमजूर, आचारी, स्वयंपाकी, गॅरेज मेकॅनिकल, हमाल, रिक्षा चालक, व्यापारी प्रतिष्ठान वर काम करणारे कामगार, विविध वाहनांवर काम करणारे चालक व वाहक या व इतर असंघटीत कामगारांना बांधकाम मजुरांप्रमाणे असंघटीत कामगारांचा दर्जा देणे तथा कोरोनामुळे त्यांची कामे बंद असल्यामुळे त्यांना आर्थिक पॅकेज देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २० जून, २०२० वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री आणि कामगार मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सर्व प्रकारचे किती असंघटित कामगार काम करीत आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. हसन मुश्रीफ (१३-०१-२०२२) :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) लेबर ब्युरो चंदिगड यांनी सन २०१४ मध्ये जाहीर केलेल्या ४ थ्या वार्षिक रोजगार-बेरोजगारी सर्वेक्षण अहवालानुसार राज्यात सुमारे ३,६५,२५,१४९ इतके असंघटित कामगार आहेत.

(३) राज्यातील विविध असंघटित कामगार घटकांकरिता जसे परवानाधारक रिक्षाचालक, नोंदणी सक्रिय घरेलू कामगार, नोंदणी सक्रिय बांधकाम मजूर, अधिकृत फेरीवाले व पथविक्रेते यांना प्रत्येकी रु.१५००/- इतके एकवेळचे

अर्थसहाय्य राज्य शासनाकडून देणेबाबतची कार्यवाही करण्यात आली.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासंदर्भात करावयाच्या उपाययोजना.**

**(३२) ३२४५७ (१०-०१-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजेश पवार (नायगांव),श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), राहूल नार्वेकर (कोलाबा):** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी शासकीय पातळीवर मोठया प्रमाणात योजनांची अंमलबजावणी करुनही कुपोषित बालकांच्या संख्येत तीन पटीने वाढ झाली असून कुपोषित बालकांच्या विशेष धडक शोधमोहिमेत एकूण १८ हजार ९१४ अतितीव्र कुपोषित बालके व १ हजार ५७८ बालके दुर्धर आजाराने त्रस्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील जव्हार, डहाणू, वाडा आदि आदिवासी बहुल तालुक्यामध्ये सुमारे ३ हजार ४९ बालके कुपोषित असल्याचे व यामध्ये २७० बालके अतितीव्र कुपोषित श्रेणीत असल्याची बाब तसेच शहापूर तालुक्यामध्ये ( जि.ठाणे ) एप्रिल, २०२० ते मार्च, २०२१ पर्यंत ०१ ते १ आणि एक ते पाच वयोगटातील ५३ बालकांचा मृत्यू झाल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२१मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून गत ५ वर्षाच्या कालावधीत सुमारे ९९ हजार १२२ बालमृत्युची नोंद होऊन यामध्ये देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई शहरात सर्वाधिक ९ हजार १५० बालमृत्यू झाले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, देशातील ३३ लाख मुले ही कुपोषति असून त्यातील निम्मी मुले अती कुपोषित गटात असून त्यांचे प्रमाण महाराष्ट्र, बिहार, गुजरात या राज्यात सर्वाधिक असून महाराष्ट्रात ही संख्या ६.१६ लाख असून त्यापैकी मध्यम कुपोषित मुले १.७७ लाख असून जास्त कुपोषत मुलांची संख्या ४.७५ इतकी आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, चाईल्ड राईटस आणि यू या संघटनेच्या मते सदर स्थितीस कोरोनाची साथ प्रामुख्याने कारणीभूत असून सामाजिक व आर्थिक घटक नकारात्मक असल्याचे त्यांच्या सर्वेक्षणात म्हटले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, कुपोषित बालकांचे प्रमाण कमी करण्यासाठी अनेक योजना राबविण्यात येत असून देखिल राज्यातील कुपोषणाचे प्रमाण कमी न होण्याची कारणे काय आहे,
(६) तसेच, राज्यातील कुपोषाचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (११-०१-२०२२) :** (१) हे खरे नाही.

माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये SAM बालकांसाठी घेण्यात आलेल्या विशेष शोध मोहिमेअंतर्गत राज्यामध्ये सर्वसाधारण बालके- ५०५३१२०, SAM बालके - १८९१४ व MAM बालके - ९७८७६ तसेच १५७८ एवढी दुर्धर आजारने ग्रस्त बालके आढळली आहेत.
(२) माहे ऑगस्ट, २०२१ मधील विशेष शोधमोहिमेंतर्गत पालघर जिल्ह्यामध्ये सर्वसाधारण बालके -१८६०९२, SAM बालके - २७० व MAM बालके- २७७९ तसेच ६६ एवढी दुर्धर आजाराने ग्रस्त बालके आढळली आहेत. शहापूर तालुक्यात माहे एप्रिल, २०२० ते मार्च, २०२१ पर्यंत ० ते १ वर्ष आणि १ वर्ष ते ५ वर्षाच्या वयोगटातील बालकांचे ३२ बालमृत्यु झाले आहेत व डोळखांब तालुक्यात १८ बालमृत्यु झाले आहेत. गेल्या ५ वर्षाच्या (२०१६-१७ ते २०२०-२१) कालावधीत ९५८२० बालमृत्यू नोंदविले गेले आहेत तसेच सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात एप्रिल, २०२१ ते जून, २०२१ या कालावधीत ३३०२ एवढे बालमृत्यु झाले आहेत. तसेच मुंबई शहरामध्ये गेल्या ५ वर्षाच्या कालावधीत ८८४० व सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात एप्रिल, २०२१ ते जून, २०२१ या कालावधीत एकूण ३०९ बालमृत्यु नोंदविले गेले आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) कुपोषणाचे प्रमाण वाढीसाठी खालील कारणे प्रामुख्याने दिसून येतात.
१. जन्मत: मुलाचे कमी वजन (२५०० ग्रॅम पेक्षा कमी)
२. गरोदरपणातील आरोग्याची काळजी
३. गरोदरपणातील रक्तक्षय व बाळंतपण दवाखान्यात न होणे
४. प्रसुती दरम्यान व प्रसुती पश्चात निर्माण झालेल्या समस्या
५. मुलांचे दिर्घ आजार
६. आजारपणातील उपचाराची तत्परता व गुणात्मकता
७. अशुद्ध पाणी पुरवठा
८. आदिवासी लोकांतील अनिष्ठ रुढी, परंपरा व अंधश्रद्धा इत्यादी

९. गरीबी
१०. कमी वयात, गरोदरपणात, वारंवार गर्भारपण तसेच दोन प्रसूतीमधील कमी अंतर
११. महिलांमध्ये आरोग्य व पोषण विषयक शिक्षणाचा अभाव
१२. जनजागृतीचा अभाव

(६) राज्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत:-

१. एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालकांना, गरोदर, स्तनदा मातांना THR व ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना कोविड १९ मुळे गरम ताजा आहाराऐवजी THR अंतर्गत घरपोच आहार देण्यात येतो.

२. तसेच आदिवासी प्रकल्पामध्ये अमृत आहार योजना सुरु असून ह्या योजनेंतर्गत गरोदर, स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो. तसेच ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील शाकाहारी बालकांना २ केळी व मांसाहारी बालकांसाठी १ अंडे आठवड्यातून ४ दिवस देण्यात येते.

३. तसेच राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम बाल विकास केंद्र सुरु करण्यात आली आहेत. ग्राम बाल विकास केंद्रामध्ये तीन वेळचा अतिरिक्त आहार व आरोग्य खात्यामार्फत औषधोपचार करण्यात येतो.

४. राज्यात पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध स्तरावरुन निरंतर शिक्षण वृध्दीदृष्टीकोन (ILA) समुदाय आधारित कार्यक्रम (CBE), रिअल टाईम मॉनिटरींग (ICT-RTM) व जनआंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

---

## कंधार (जि.नांदेड) शहरात ग्राहक सेवा केंद्राच्या नावावर ग्राहकांची आर्थिक लूट होत असल्याबाबत.

**(३३) ३२६०५ (०२-०१-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कंधार (जि.नांदेड) शहरात एकच राष्ट्रीयकृत बँक असल्याने या बँकेवरील ताण कमी व्हावा या उद्देशाने येथे अनेक ग्राहक सेवा केंद्र उभारण्यात आली आहेत, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या ग्राहक सेवा केंद्र चालकांकडून ग्राहकांची लूट होत असून पैसे काढण्यासाठी व भरण्यासाठी हजार रुपयाला दहा रुपये कमिशन घेतले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने या प्रकरणात लक्ष घालून संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार (१०-०१-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही. ग्राहकास दहा हजार रूपयापर्यंतची रोख रक्कम खात्यातून काढण्यास किंवा खात्यात भरणा करण्यास कोणताही अधिभार किंवा फी लागू नाही. ग्राहक ही रक्कम कुठल्याही कमिशनशिवाय काढू शकतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंत्रालयात दारूच्या रिकाम्या बाटल्या सापडल्याबाबत**

**(३४) ३२९३१ (०७-०१-२०२२). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्रशासनाच्या दृष्टीने महत्त्वाची वास्तू असलेल्या मंत्रालयातच दारूच्या रिकाम्या बाटल्यांचा खच सापडल्याने मंत्रालयातील एकूणच सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असल्याचे दिनांक ११ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाच्या चौकशीचे आदेश सामान्य प्रशासन विभागाने दिले असल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर विषयी चौकशीमध्ये कोणती बाब निदर्शनास आली व शासनातर्फे संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील (१४-०१-२०२२) :** (१) सदरची घटना दिनांक ११ ऑगस्ट,२०२१ नसून दिनांक १० ऑगस्ट, २०२१ रोजीची आहे. मंत्रालयाच्या आवारात दारुच्या रिकाम्या बाटल्या सापडल्या हे खरे असले तरी सदर घटनेमुळे सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असे म्हणणे योग्य ठरणार नाही.
(२) हे खरे नाही, तर गृह विभागांतर्गत चौकशी करण्यात आली आहे.
(३) चौकशी अहवालामध्ये ज्या कर्मचाऱ्यांनी दारुच्या बाटल्या मंत्रालय परिसरात आणल्याचे आढळून आले आहे त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशीची कारवाई करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारा येथील महिला रूग्णालयाच्या उर्वरीत बांधकामाचे प्रशासकिय मान्यता व निधी मंजुरीबाबत**

**(३५) ३३२४० (०७-०१-२०२२). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा येथील महिला रूग्णालय चे बांधकामास शासन निर्णय क्र. प्रशामा २०१६/प्र.क्र. २२०/आरोग्य-२, दि. ७/७/२०१७ नुसार रू. ४३८४.०० लक्ष रूपये प्रशासकिय मान्यता प्राप्त असुन

Green Building संकल्पनेवर आधारीत नव्याने रू. ४३५४.२५ लक्ष रूपयांचा महिला रूग्णालय भंडारा चा उर्वरीत बांधकामाचा प्रस्ताव जा.पत्र क्र. ७८७-९०/२१२१, दि. १३/०१/२०२१ रोजी नुसार सहसंचालक, आरोग्य सेवा रूग्णालये मुंबई यांना उपसंचालक, आरोग्य सेवा नागपूर मंडळ, नागपूर यांनी सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुगणालयाचा उर्वरीत बांधकामाचा ४३५४.२५ लक्ष रूपयाचा प्रस्ताव शासन मंजुरीस्तव सादर केला आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्ताव निधी मंजुरीस्तव व प्रशासकीय मान्यता देणे संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (१८-०१-२०२२) :** (१) होय,हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रस्तावातील त्रूटींची पूर्तता करुन सुधारीत प्रशासकिय मान्यता देण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

### जळगांव जिल्हयातील मुक्ताईनगर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, कु-हा येथे ग्रामीण रुग्णालयाची निर्मिती तसेच मुक्ताईनगर येथील उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याबाबत

**(३६) ३३३१२ (१०-०१-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हयातील मुक्ताईनगर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, कु-हा येथे ग्रामीण रुग्णालयाची निर्मिती करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे सप्टेंबर, २०२० पासून लेखी निवेदनाद्वारे मा. आरोग्य मंत्री, यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, मुक्ताईनगर उपजिल्हा रुग्णालयात १०० खाटांची श्रेणी वर्धन प्रस्तावास मान्यता मिळणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे सप्टेंबर, २०२० पासून लेखी निवेदनाद्वारे मा. आरोग्य मंत्री, यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या मागणीसंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्यांचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (१८-०१-२०२२) :** (१) सदर निवेदनाची प्रत विभागात आढळून आली नाही.परंतू, प्राथमिक आरोग्य केंद्र,कु-हा ता.मुक्ताईनगर जि.जळगावचे ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्याचा प्रस्ताव क्षेत्रीय कार्यलयाकडून तयार करण्यात येत आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३) सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारीत जोड बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरू असून उपजिल्हा रुग्णालय, मुक्ताईनगरचे १०० खांटांच्या उपजिल्हा रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्याची मागणी निकषात बसत असल्यास जोडबृहत आराखड्यामध्ये समाविष्ट करण्यात येईल.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**केंद्र शासनाच्या "बेटी बचाओ बेटी पढाओ" योजनेच्या अंतर्गत "माझी कन्या भाग्यश्री"या योजने अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यात लाभार्थ्यांची नोद कमी असल्याबाबत.**

**(३७) ३३६३४ (१०-०१-२०२२). श्री.राजेश पवार (नायगांव), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने सन २०१४ मध्ये सुरू केलेल्या "बेटी बचाओ बेटी पढाओ" या योजने अंतर्गत "माझी कन्या भाग्यश्री"ही योजना बुलढाणा जिल्ह्यात राबवण्यात येत मात्र यावर्षात फक्त २४ लाभार्थ्यांनीच या योजनेचा लाभ घेतला असून जिल्ह्यातील ६ तालुक्यात एकही लाभार्थ्यांची नोंद नाही असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२१ -२०२२ वर्षाकरीता अनेक लाभार्थ्यांना अद्याप निधी मिळालेला नाही. हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासाठी पात्र २८ लाभार्थ्यासाठी निधीची मागणी १४ जून रोजी आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा यांच्याकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, निधी वितरणाबाबतची सद्यस्थिती काय आहे,
(५) असल्यास, या योजनेविषयी जनजागृती करण्यासह निधी वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (११-०१-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) माझी कन्या भाग्यश्री या राज्य योजनेतंर्गत सन २०२०-२१ या अर्थिक वर्षामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील एकूण पात्र ४७ लाभार्थ्यांपैकी १० तालुक्यातील २१ लाभार्थ्यांना निधीच्या उपलब्धतेनुसार लाभ देण्यात आला आहे. त्यानुसार सन २०२०-२१ मधील उर्वरित २६ तसेच सन २०२१-२२ या आर्थिक वर्षातील ५ अशा एकूण ३१ लाभार्थ्यांना लाभ देण्याकरिता निधी वितरित करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आर्थिक वर्षातील जीएसटी थकबाकी केंद्राकडून मिळणेबाबत**

**(३८) ३३९५६ (०५-०१-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्याला केंद्र शासनाने द्यावयाच्या जीएसटीच्या थकबाकीने ३० हजार कोटी रुपयांचा आकडा ओलांडला असून लवकरच ५० हजार कोटी रुपयांच्या घरात जाणार असल्याचे दिनांक १५ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जीएसटी भरपाई कायद्याअंतर्गत राज्यांना केंद्राकडून देण्यात येणाऱ्या भरपाईसाठीचा पाच वर्षाचा कालावधी सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षात संपुष्टात येणार असल्यामूळे, जीएसटीमुळे राज्यांचे घटलेले महसुली उत्पन्न लक्षात राज्याला २०२१-२०२२ नंतर सुद्धा केंद्र सरकारकडून जीएसटी भरपाई मिळावी यासाठी राज्य सरकारकडून जीएसटी परिषदेत भूमिका मांडण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१५ मध्ये राज्य शासनाने २५ महानगरपालिका क्षेत्रात एलबीटी माफ केला असता महानगरपालिकांना ३२९० कोटी रु अनुदान म्हणून दिलेली रक्कम २०१५-१६ च्या महसुलात परीगणित न झाल्याने राज्याला २८००० कोटीहून अधिक जीएसटी भरपाई मिळू शकली नसल्याने नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त जीएसटीची थकबाकी राज्याला मिळावी याकरीता राज्याचे मा.वित्तमंत्री यांनी केंद्र शासनाकडे ४३ व्या जीएसटी परिषदेत मागणी केली, हे ही खरे आहे काय,
(५) तसेच, सदरील रक्कम सन २०१५-१६ महसुलात परीगणित करण्यासाठी राज्यशासनाकडून केद्र सरकारकडे किंवा जीएसटी परिषदेत पाठपुरावा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय, राज्यात कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी लागू केलेल्या लॉकडाऊनमुळे राज्याच्या आर्थिक परिस्थितीवर परिणाम होऊन राज्याचे अर्थचक्र सावरण्यासाठी मागील आर्थिक वर्षातील केंद्राकडून थकबाकीची २४ हजार कोटी रुपये महाराष्ट्राला येणे आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, राज्यात, कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी लागू केलेल्या लॉकडाऊनमुळे राज्याच्या आर्थिक परिस्थितीवर परिणाम होऊन राज्याचे अर्थचक्र सावरण्यासाठी मागील आर्थिक वर्षातील केंद्राकडून थकबाकीची मिळविण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (२४-०१-२०२२):** (१) वस्तू व सेवाकरची नुकसान भरपाई पोटीची सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ ची एकूण थकबाकी रु.२८३६५ कोटी आहे.(दि.१७.०१.२०२२ पर्यंत)
(२) जीएसटी नुकसान भरपाई कायद्यांतर्गत केंद्राकडून राज्यांना देण्यात येणाऱ्या जीएसटी नुकसान भरपाईसाठीचा पाच वर्षाचा कालावधी ३० जून २०२२ रोजी संपुष्टात येणार आहे.
जीएसटीमुळे राज्याचे घटलेले महसूली उत्पन्न लक्षात घेवून राज्याला ३० जून २०२२ रोजी नंतर सुध्दा केंद्रशासनाकडून राज्यास नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी मा.उप मुख्यमंत्री यांनी लखनौ तसेच नवी दिल्ली येथे नुकत्याच झालेल्या जीएसटी कौन्सिल च्या बैठकीत मांडली आहे.
(३) हो हे खरे आहे.
(४) याप्रकरणी मा.मुख्यमंत्री, मा.अर्थमंत्री व मुख्य सचिव यांनी पत्रव्यवहार करुन पाठपुरावा केलेला आहे.
(५) मागील आर्थिक वर्षातील केंद्राकडून थकबाकीच्या २४ हजार कोटी रुपये महाराष्ट्राला येणे आहे, हे खरे नाही. मागील आर्थिक वर्षातील केंद्राकडून जीएसटी नुकसान भरपाई पोटी थकबाकी असलेली रक्कम खालीलप्रमाणे:

| सन | रक्कम (कोटी) (१७जानेवारी २०२२ पर्यंत) |
|---|---|
| २०१९-२० | १०२९ |
| २०२०-२१ | ९९३४ |
| **एकूण** | **१०९६३** |

(६) मा.मुख्यमंत्री, मा.अर्थमंत्री यांनी पत्रव्यवहार केलेला आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील चांदूर रेल्वे तालुक्यातील आरोग्य केंद्रावरील रुग्णवाहिका नादुरुस्त असल्याने रुग्णांचे गैरसोय होत असल्याबाबत**

**(३९) ३४००३ (१०-०१-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील चांदूर रेल्वे तालुक्यातील आरोग्य केंद्रावरील १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका नादुरुस्त असल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आपत्कालीन परिस्थितीमध्ये रुग्णांना नेण्याकरीता रुग्णवाहिका उपलब्ध नसल्याने रुग्णांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर आरोग्य केंद्रावर तात्काळ रुग्णवाहिनी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (१८-०१-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
चांदूर रेल्वे परिसरातील रुग्णांना धामनगाव रेल्वे, गुईखेडा, कु-हा, नांदगाव येथील रुग्णावाहिका उपलब्ध करुन दिलेली आहे.
(३) सदर रुग्णवाहिका दुरुस्त करुन दि. ०३ ऑक्टोबर, २०२१ पासून पूर्ववत सुरु करण्यात आली आहे.
४) प्रश्न उदभवत नाही.

---

**हिंगणा व धर्मापूर (जि.नागपूर) येथे चिमुकल्यांसह गर्भवती मातांना निकृष्ट दर्जाचे खजूर वाटप झाल्याबाबत**

**(४०) ३४३२४ (०६-०१-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणा व धर्मापूर (जि.नागपूर) येथे चिमुकल्यांसह गर्भवती मातांना खजूर वाटण्यात आले असता त्यात धर्मापूर येथे निकृष्ट दर्जाचे खजूराचे वाटप झाले असल्याचे दिनांक १२ सप्टेबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महिला व बाल विकास विभागाने त्याचे नुमने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले मात्र अद्यापही अहवाल प्राप्त झाला नसल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली काय,
(४) असल्यास, त्यानुसार संबंधित पूरवठा धारकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेख्,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (११-०१-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) जिल्हा परिषदच्या सेस फंडातुन सन २०२०-२१ अंतर्गत कुपोषित मुला-मुलींना, किशोरवयीन मुलींना व गरोदर- स्तनदा मातांना अतिरिक्त आहार पुरविणे या योजनेंतर्गत देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार संबंधित पुरवठाधारकाने दि.५.५.२०२१ ते दि.७.५.२०२१ या कालावधीमध्ये (सिडलेस खजूर) या साहित्याचा पुरवठा केला होता. सदर पुरवठ्याचे नमुने प्रकल्प स्तरावरुन नागपूर व हिंगणा येथून रॅन्डम पद्धतीने प्रयोगशाळा तपासणी करिता पाठविण्यात आले होते. प्रयोगशाळा तपासणीच्या अहवालानुसार खजूर मध्ये Specifications नुसार घटकांचे प्रमाण आढळून आलेले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बालकाच्या सुरक्षेसाठी वितरीत करण्यात येणारे केअर किट निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत.**

**(४१) ३४५१२ (०६-०१-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.शिरीष चौधरी (रावेर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महिला व बालविकास विभागाकडून नवजात बालकाच्या सुरक्षेसाठी केअर किट देण्यात येतात तथापि प्रशासनाच्या गैरकारभारामुळे त्या किटमध्ये पावसाचे पाणी शिरल्याचे निदर्शनास येऊनही त्याच किटचे वाटप करण्यात आले असल्याची बाब दिनांक १७ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घटनेमुळे किट मिळालेल्या लाभार्थ्यामध्ये असंतोष पसरत असल्याचे निदशर्नास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाला जबाबदार असलेल्या प्रशासनातील अधिका-यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, त्यानुसार यामध्ये दोषी असण्या-या संबधितावर कारवाई करण्यासह भविष्यात अश्या घटना घडू नयेत यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलबची कारणे काय आहेत?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (११-०१-२०२२) :** (१) राज्यातील एकूण ११०४८६ अंगणवाडी केंद्रांपैकी फक्त अमरावती जिल्हयातील ग्रामीण प्रकल्पातील एका अंगणवाडी केंद्रामधील एका लाभार्थ्याला किंचीत ओलसर झालेली किट वाटप करण्यात आली होती.
(२), (३), (४) व (५) बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयामार्फत फक्त एका लाभार्थ्याला अनावधनाने ओली झालेली किट वाटप केल्यामुळे नाराजी होती. परंतु लगेच किट बदलवून

चांगली किट देण्यात आली. तसेच संबधित विस्तार अधिकारी (सां) व कनिष्ठ सहायक यांना सक्त ताकीद देऊन त्यांच्या सेवा पुस्तिकेत नोंद करण्यासाठी आदेशित केले आहे. यापुढे अशी घटना घडू नये म्हणून सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना सूचित करण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्‌वभवत नाही.

---

**देऊळगाव (ता. आरमोरी, जि. गडचिरोली) येथे नविन प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करण्याबाबत.**

**(४२) ३४६९७ (१०-०१-२०२२). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी, दुर्गम व नक्षलग्रस्त अश्या देऊळगाव (ता. आरमोरी, जि. गडचिरोली) येथे प्राथमिक आरोग्य केंद्रा अभावी परिसरातील नागरीकांना आरोग्य सुविधेपासुन वंचीत रहावे लागत असल्याची बाब माहे आक्टोंबर २०२१ च्या दुसऱ्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आलेली आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपसंचालक आरोग्य सेवा, नागपूर मंडळ नागपूर यांनी देऊळगाव येथे नविन प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापन करण्याचा प्रस्ताव दि. २७ नोव्हेंबर २०१९ रोजी वा त्यासुमारास शासनाला सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनीधीनी यांनी दिलेल्या निवेदनावर मा. मंत्री यांनी देऊळगाव येथे नविन प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापनेचा प्रस्ताव मंजुरी करीता सादर करण्याचे निदेश प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांना दि. १६ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे (१८-०१-२०२२) :** (१) नाही, हे खरे नाही.
देऊळगावं ता.आरमोरी जि. गडचिरोली येथे प्राथमिक आरोग्य पथक कार्यरत असुन त्याव्दारे तेथील जनतेला आरोग्य सेवा पुरविण्यात येतात.
(२) हे अंशत: खरे आहे.
उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ नागपूर यांनी दि.२७ नोव्हेंबर, २०१९ रोजी आयुक्तालयाला सदर प्रस्ताव सादर केला आहे.
(३) आणि (४) होय, हे खरे आहे.
सदर प्रस्तावाची आयुक्तालय स्तरावरील छाननी समितीने छाननी केली असता प्राथमिक आरोग्य केंद्राच्या मंजूरीसाठी निश्चित केलेल्या अंतराच्या व लोकसंख्येच्या निकषात सदर संस्था बसत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका येथील आमपाडा विभागात अंगणवाडी बालकांच्या पोषक आहाराची रिकामी पाकिटे मिळाल्याबाबत**

**(४३) ३४९९२ (०६-०१-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये आमपाडा विभागात १००० पेक्षा अधिक अंगणवाडी बालकांच्या पोषक आहाराची रिकामी पाकिटे एकाच ठिकाणी मिळाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी दिनांक २४ मे, २०२१ रोजी मा. महिला व बालविकास मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार यास जबाबदार असण्या-या संबधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**अॅड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (११-०१-२०२२) :** (१) ,(२),(३) व (४) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या आमपाडा परिसरामध्ये पोषण आहाराची रिकामी पाकिटे कचरा डेपोमध्ये आढळल्याची व्हिडियो क्लीप यू ट्युब चॅनल वर आढळून आली होती. तथापी, या प्रकरणी चौकशी केली असता कोणत्याही प्रकारची रिकामी पाकिटे आढळून आलेली नाहीत व लाभार्थ्यांकडे चौकशी केली असता लाभार्थ्यांना पोषण आहार मिळाल्याचे आढळून आले आहे

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महिला व बालविकास विभाग, जिल्हा परिषद, रत्नागिरी मुख्यालय व एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमधील पोषण अभियानांतर्गत काम करणा-या कंत्राटी कर्मचा-यांना मानधन मिळालेले नसल्याबाबत**

**(४४) ३५०९१ (०७-०१-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालविकास विभाग, जिल्हा परिषद, रत्नागिरी मुख्यालय व एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमधील पोषण आहार अभियानांतर्गत काम करणा-या कंत्राटी कर्मचा-यांना मानधनच मिळालेले नसल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना महामारीचा काळात या कर्मचा-यांना काम करुनही मानधन न मिळण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तदनुसार शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (११-०१-२०२२) :** (१) हे खरे नाही,
पोषण अभियान अंतर्गत काम करणा-या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे १ एप्रिल २०२१ ते ३० सप्टेंबर २०२१ पर्यंतचे मानधन रक्कम रु.९,२९,६७,८४७/- (अक्षरी रु. नऊ कोटी एकोणतीस लाख सदुसष्ट हजार आठशे सत्तेचाळीस) सर्व करांसहित दि.१६.०९.२०२१ रोजी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळास अदा करण्यात आलेले आहे.
(२), (३), (४) व (५) पोषण अभियानाअंतर्गत तांत्रिक मनुष्यबळाची नियुक्ती दि.१५.०२.२०१९ पासून करण्यात आलेली आहे. दि.१५.०२.२०१९ ते ३०.०९.२०२१ या कालावधीचे मानधन एकूण रक्कम रु.५९,१८,८७,८६६/- (अक्षरी रु. एकोणसाठ कोटी अठरा लाख सत्तयाऐंशी हजार आठशे सहासष्ट) वेळोवेळी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळास अदा करण्यात आलेले आहे.

---

## राज्यातील पोकरा प्रकल्प योजने अंतर्गत शेतकरी शासकीय योजनांच्या लाभांपासून वंचित राहिले असल्याबाबत

**(४५) ३५१७९ (०५-०१-२०२२). श्री.संदिप क्षिरसागर (बीड), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री. मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १५ जिल्हयांमध्ये शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प (पोकरा) योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोकरा प्रकल्पाची अंमलबजावणी होत असलेल्या गावांमध्ये शासनाच्या विविध योजनांसह कृषी खात्याच्या योजना राबविल्या जात असताना एकीकडे पोकरा अंतर्गत गावातील दोन हेक्टरच्या आतील शेतकऱ्यांना कृषी विभागाकडे महाडीबीटी पोर्टलद्वारे अर्ज करता येत नाही तर दुसरीकडे पोकरा प्रकल्पाने कृषी यांत्रिकीकरणातील अनेक घटकांसाठी अर्ज प्रक्रिया थांबविण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांना उक्त योजनेच्या लाभांपासून वंचित राहावे लागत असल्याचे दिनांक १४ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामसेवकांनी बहिष्कार आंदोलन पुकारल्यामुळे शेतकऱ्यांचे अर्ज ग्राम समितीकडेच प्रलंबित राहिल्यामुळे पोकरा प्रकल्पातून कृषीपंप, पाईप लाईन, इंजिन कृषी अवजारे कृषी योजनेतंर्गत मिळू शकले नसल्यामुळे शेतकऱ्यांना पोकरा प्रकल्पाची संधी नाकारण्यात आल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पोकरा प्रकल्पातंर्गत शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२४-०१-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नानाजी देशमुख कृषि संजीवनी योजनेतून वैयक्तिक लाभार्थ्यांना कृषि यांत्रिकीकरणातील घटकांसाठी अर्ज प्रक्रिया थांबविल्यानंतर महा-डीबीटी प्रणालीवर सदर बाबीसाठी प्रकल्प क्षेत्रातील शेतकऱ्यांची निवड करण्यात येत आहे.

(३) होय. जळगाव जिल्ह्यातून ॲड. रोहिणी एकनाथराव खडसे यांनी याविषयीचे पत्र दि.२९.७.२०२१ रोजी दिले होते.
(४) व (५) मा. उपमुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली संबंधित शासकिय विभागांचे सचिव व मान्यता प्राप्त ग्रामसेवक संघटना यांचे प्रतिनिधी यांची बैठक दि.२.८.२०२१ रोजी आयोजित केली होती. या बैठकीमध्ये केलेल्या आवाहनानुसार ग्रामसेवकांनी बहिष्कार आंदोलन मागे घेतले व ग्राम कृषि संजीवनी समित्यांचे गठन करण्याची प्रक्रिया सुरु होऊन पोकरा प्रकल्पातील लाभार्थ्यांस लाभ देण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली.

---

**राज्य सांख्यिकी आयोग स्थापनेबाबत**

**(४६) ३६१३१ (०५-०१-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धोरण निश्चितीसाठी अद्ययावत व विस्तृत सांख्यिकी माहितीचे असलेले महत्व लक्षात घेता केंद्राच्या धर्तीवरच राज्यामध्ये राज्य सांख्यिकी आयोग (State Statistical Commission) स्थापन करणे आवश्यक आहे. याबाबत राज्य शासन विचाराधीन आहे काय,
(२) राज्य शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या उपलब्ध योजनांचे शाश्वत विकास ध्येयांच्या प्राप्तीच्या दृष्टीने मूल्यमापन करण्यात येते का,
(३) असल्यास, त्याचा तपशील काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. अजित पवार (१०-०१-२०२२) :** (१) नाही.
(२) संयुक्त राष्ट्र संघाकडून घोषित करण्यात आलेली शाश्वत विकास ध्येये, उद्दिष्टे व निर्देशांक यांची सांगड राज्य शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रम / योजनांशी घालण्याची ही प्रक्रीया पूर्ण करण्यात येत असून, त्या आधारे कार्यक्रम / योजनांचे मूल्यमापन शाश्वत विकास ध्येयांच्या प्राप्तीच्या उद्देशाने माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन करण्याचे नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सुधागड (जि.रायगड) येथील ग्रामीण रूग्णालय इमारतीचे बांधकामास विलंब होत असल्याबाबत**

**(४७) ३६१९१ (१०-०१-२०२२). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुधागड (जि.रायगड) येथील ग्रामीण रूग्णालय इमारतीचे काम अद्याप सुरू झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम सुरू न करण्यास होणाऱ्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे (२०-०१-२०२२) :** (१),(२) व (३)

दिनांक २८.०६.२०२१ च्या शासन निर्णयान्वये, ग्रामीण रुग्णालय, पाली- सुधागड येथील रुग्णालयाच्या मुख्य इमारत व निवासी गाळे बांधकामाच्या रु.२०,२७,३३,३१५/- (रुपये वीस कोटी, सत्तावीस लाख, तेहत्तीस हजार, तीनशे पंधरा फक्त) इतक्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने बांधकामाबाबतची निविदा प्रक्रिया कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग यांचेस्तरावरुन सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम देण्याबाबत**

**(४८) ३६४१९ (०२-१२-२०२१). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील सुमारे ६,३०० शेतकऱ्यांचा सन २०१८ मध्ये खरीप व रब्बी हंगामातील पिक विमा मंजूर झालेल्या असताना संबंधित कंपनीने पिक विम्याची रक्कम न दिल्यामुळे शेतकरी आणि विविध सामाजिक संघटनांनी पुणे येथे दि. ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीच्या वाकडेवाडी येथील कार्यालयासमोर सन २०१९ मध्ये सत्याग्रह आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सदर कंपनीकडून पिक विम्याची रक्कम देण्यासह पिक विम्याची रक्कम न देणाऱ्या संबंधित विमा कंपनीविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (१८-०१-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत बीड जिल्हयातील एकूण ११ तालुक्यासाठी खरीप २०१८ मध्ये एकूण १२.८९ लाख शेतकऱ्यांना रु. १३२५.९२ कोटी ओरिएन्टल इन्शुरन्स कंपनीमार्फत व रब्बी २०१८ मध्ये एकूण ७.८० लाख शेतकऱ्यांना रु. ३५६.५९ कोटी बजाज अलियान्झ कंपनीमार्फत वाटप करण्यात आलेली आहे.

---

### राज्यातील अंगणवाडयामधील भरती प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत

**(४९) ३६४३३ (०७-०१-२०२२). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यातील ६९ अंगणवाड्यांमधील भरती प्रक्रिया थांबविण्याचे पत्र एकात्मिक बाल विकास योजनेने दिले असल्याची बाब माहे सप्टेंबर २०२१ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोविडच्या पार्श्वभुमीवरअंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस पदभरतीसाठी आता उमेदवारांना ३० ऐवजी २ वर्षाने वयोमर्यादेत वाढ करुन कमाल मर्यादा ३२ पर्यंत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गोंदिया जिल्ह्यातील व संपूर्ण राज्य भरातील अंगणवाड्यांमधील भरती प्रक्रिया कधी पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (११-०१-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस या पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी दिनांक १३/०८/२०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार विहित करण्यात आलेली ३० वर्षाची वयोमर्यादा शिथील करुन त्यामध्ये दोन वर्षाची वाढ करण्यास मान्यता देण्यात आलेली असून ही शिथिलता केवळ कोव्हिड प्रादुर्भावामुळे पदभरतीस झालेल्या विलंबामुळे करण्यात आलेली असल्याने ती मर्यादित कालावधीसाठी म्हणजे दि.३१.०३.२०२२ पर्यंत होणाऱ्या पदभरतीसाठीच लागू राहणार आहे.

(३) व (४) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांचे रिक्त पदांच्या भरती संदर्भात शासन निर्देशानुसार क्षेत्रिय स्तरावर रिक्त पदांच्या भरतीची प्रक्रिया सुरु आहे. भरती प्रक्रिया पुर्ण होणाऱ्या ठिकाणी नियुक्ती आदेश देण्यात येत आहेत. सद्यस्थितीत १५८९ अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका, व ७११ अंगणवाडी मदतनीस यांना नियुक्ती आदेश देण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### आडस (ता.केज, जि.बीड) येथील पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी नवीन इमारत बांधकामास मंजुरी देण्याबाबत

**(५०) ३६५६८ (०२-१२-२०२१). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आडस (ता.केज, जि.बीड) येथील पशुवैद्यकीय दवाखान्याची इमारत खूप जुनी असून अत्यंत नादुरुस्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीच्या भिंती नादुरुस्त असुन स्लॅब गळत असल्याने औषधे, कागदपत्रे पाण्याने खराब झाले असुन डॉक्टरांना इमारतीत बसता येत नसल्यामुळे आडस येथील पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी नवीन इमारत बांधकामास मंजुरी देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्याकडे दिनांक १४ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुनिल केदार (०७-०१-२०२२) :** (१) सदर इमारत नादुरुस्त व जीर्ण झाली असल्याची बाब निदर्शनास आली आहे.
(२) सदर इमारत ३ खोल्यांची असून त्यापैकी २ खोल्या जीर्ण व गळक्या आहेत. एक खोली सुरक्षित आहे. परंतु, त्यामुळे दवाखान्याचे औषधी, कागदपत्रे व साहित्य खराब झालेले नसून ते सुरक्षित आहेत. तसेच तात्पुरत्या स्वरुपात तलाठी कार्यालयातील एक खोली सदर दवाखान्यास वापरण्यासाठी दिलेली आहे.
स्थानिक लोकप्रतीनिधींनी सदर पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी नवीन इमारत बांधण्याची मागणी केलेली आहे.
(३) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२१-२२ मध्ये जिल्हा नियोजन समितीने सदर इमारतीसाठी रु. २३५.९३ लक्ष निधी प्रारुप आराखडयामध्ये मंजूर केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.